0 6 FEB 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा अर्जांचे वेळापत्रक जाहीर

## २३ फेब्रुवारीपर्यंत विनाविलंब संधी : अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची ५ मार्चची मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील मार्च-एप्रिल २०२६च्या उन्हाळी सत्रात होणाऱ्या परीक्षांचे अर्ज भरण्यासाठीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. याबाबतचे अधिकृत पत्र परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था व विभागप्रमुखांना पाठवले आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, बी.टेक, विधि, औषधनिर्माणशास्त्र, टेक्स्टाईल तसेच सर्व डिप्लोमा व सर्टिफिकेट अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी हे वेळापत्रक लागू असणार आहे. महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर विभागात विनाविलंब अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना ९ ते २३ फेब्रुवारीपर्यंत संधी आहे. विद्यार्थ्यांना ९ ते २३ फेब्रुवारीदरम्यान विनाविलंब, २४ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत ५० रुपये विलंब शुल्कासह आणि २८ फेब्रुवारी ते ५ मार्चदरम्यान ३५० रुपये अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची अंतिम संधी देण्यात आली आहे. विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क जमा करण्यासाठी विनाविलंब २४ फेब्रुवारीपर्यंत, विलंब शुल्कासह २८ फेब्रुवारीपर्यंत आणि अतिविलंब शुल्कासह ६ मार्चपर्यंत मुदत आहे. महाविद्यालये व विभागांनी अर्जांच्या याद्या विनाविलंब २७ फेब्रुवारीपर्यंत, तर विलंब शुल्कासह १० मार्चपर्यंत सादर कराव्यात, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, ३ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झालेल्या हिवाळी सत्रातील विविध ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल आतापर्यंत जाहीर झाल्याची माहितीही विद्यापीठाने दिली आहे.

06 FEB 2026

तरुण भारत

# उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

■ शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध

शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या उन्हाळी सत्रांतील परीक्षांचे अर्ज व शुल्क भरण्याच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. या सर्व तारखा शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. संबंधित महाविद्यालयांनी दिलेल्या मुदतीत शुल्क व अन्य बाबींची पूर्तता करून परीक्षा सुरळीत पार पाडावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

प्रशासनाकडून विलंब व विनाविलंब शुल्कासंदर्भातील सर्व माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. परीक्षा मंडळाने महाविद्यालयांना परीक्षा अर्ज व शुल्क निर्धारीत वेळेत जमा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांचे ऑक्टोबर-नोव्हेंबर परीक्षेचे निकाल लागले नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे निकाल लागल्यानंतर सात दिवसांत अर्ज भरून घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

0 6 FEB 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर - २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा ३ नोव्हेंबरपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. गुरुवारी ५ फेब्रुवारीरोजी बीएसस्सी, बी. आर्किटेक्ट या दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध ७ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ३६ विद्यार्थी उपस्थित होते. गुरुवारी विविध ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 6 FEB 2026

सकाळ

# विद्यापीठ परीक्षांसाठी सोमवारपासून अर्ज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल या उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गुरुवारी जाहीर केल्या आहेत. या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सोमवार (ता.९) पासून अर्ज भरता येणार आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व पदविका, प्रमाणपत्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, बी. टेक., विधी, आदी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. त्यासाठी विनाविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ९ ते २३ फेब्रुवारीपर्यंत आहे. विलंब शुल्कासह मुदत २४ ते २७ फेब्रुवारी, तर अतिविलंब शुल्कासह २८ फेब्रुवारी ते पाच मार्चपर्यंत मुदत आहे.

जनसंपर्क कक्ष

06 FEB 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल

# पदवी, पदव्युत्तरच्या ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरूवारी सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध सात परीक्षा केंद्रावर झाल्या असून परीक्षांसाठी ३६ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 FEB 2026

तरुण भारत

# कोल्हापुरात दारकरी कोळ्याच्या नव्या प्रजातीचा शोध



**कोल्हापूर शहरात दारकरी कोळ्याच्या नवीन प्रजातीचा शोध लागला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील संशोधकांनी याचा शोध लावण्यात यश मिळवले आहे. शिवाजी विद्यापीठ, शेंडा पार्क आणि पुईखडीच्या टेकडीवर सदर नवीन जातीचा कोळी आढळला आहे. याचे प्रकाशन 'जर्नल ऑफ नॅचरल हिस्ट्री' या युनायटेड किंगडमच्या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकेमधून झाले आहे. या संशोधनात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनने सहभाग घेतला आहे.**

**शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाचे संशोधन**

**शेंडा पार्क, पुईखडीच्या टेकडीवर आढळला दारकरी कोळी**

प्रतिनिधी
कोल्हापूर

हे संशोधन शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा एक भाग आहे. सत्पाल गंगलमाले यांच्यासह प्रा. डॉ. सुनील गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. यात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, अक्षय खांडेकर यांचा सहभाग आहे.

'ट्रॅपडोअर स्पायडर' या सामान्य इंग्रजी नावाने त्यांना ओळखले जाते. बिळांना दार करण्याच्या त्यांच्या



लकबीवरून त्यांना 'दारकरी' हे मराठी नाव दिले आहे. नव्याने शोधलेल्या प्रजातीमधील कोळ्यांच्या दातांची रचना आणि आठ डोळ्यांच्या मांडणीवरून त्यांचा समावेश 'टाईटनइडिओप्स' या कुळात केला आहे. 'टाईटनइडिओप्स कोल्हापूरईन्सिस' असे नाव शहरामधील त्यांच्या आढळ क्षेत्रावरून त्यांना दिले आहे. कोल्हापूरच्या या दारकरी कोळ्याची नोंद शिवाजी विद्यापीठ, शेंडा पार्क, कोल्हापूर चित्रनगरी परिसर आणि पुईखडीच्या टेकडीवरून केली आहे.

नवीन प्रजातींचे कोळी कोल्हापूरच्या नैसर्गिक माळरानांवर आढळून येत आहेत. उंदीरमारीसारख्या विदेशी वृक्षांच्या भागात या कोळ्यांचे अस्तित्व नाही. माळराने आता बांधकाम शेतीसाठी वापरल्यामुळे या कोळ्यांचा निवारा धोक्यात आला आहे. ही प्रजाती नष्ट होते की काय अशी भिती तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. अभ्यास क्षेत्राच्या आसपासच्या ३० किलोमीटर परिघात अजूनही अनुकूल अधिवास असल्याचे संशोधकांनी सांगितले.

## दारकरी कोळीचे वैशिष्ट्ये

दारकरी कोळी गवताळ माळांच्या सपाट पृष्ठभागावर उभी किंवा उतारावरील जमिनीवर तिरकी बिळे करतो. बिळांच्या सुरुवातीला बनवलेले दरवाजे बाहेरच्या बाजूने भोवतालाशी तंतोतंत मिसळलेले असतात. त्यामुळे दरवाजा बंद असतो, तेव्हा या कोळ्यांचे अस्तित्व कळून येत नाही. हा दरवाजा त्यांच्या भक्ष्यांसाठी लावलेला सापळा असतो. भक्ष टप्प्यात आले की हे कोळी त्यांना पकडतात आणि आत खेचून नेतात. हे दरवाजे कोळ्यांना त्यांच्या भक्षकांपासून संरक्षण पुरवतात. बहुतेक काळ हे कोळी बिळांत लपून किंवा दबा धरून बसलेले असतात.

0 6 FEB 2026

पुढारी

# पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनात आज व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने शुक्रवारी (दि. ६) दुपारी ३ वाजता अर्थसंकल्पावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यासनाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये व्याख्यान होईल.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विभागातील डॉ. केदार मारुलकर 'माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला बजेटने काय दिले?' या विषयावर मांडणी करणार आहेत. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सुभाष कोंबडे आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून जिज्ञासूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

06 FEB 2026

पुण्यनगरी

# डॉ. जाधव अध्यासनात आज व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे दि. ६ रोजी दुपारी ३ वाजता अर्थसंकल्पावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विभागातील डॉ. केदार मारुलकर 'माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला बजेटने काय दिले?' या विषयावर मांडणी करणार आहेत. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. सुभाष कोंबडे आहेत. अध्यासनाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये हा कार्यक्रम होईल, असे अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी कळवले आहे.

0 6 FEB 2026

जनप्रवास

# डॉ. जाधव अध्यासनात अर्थसंकल्पावर व्याख्यान

**कोल्हापूर :** पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने शुक्रवार ६ रोजी दुपारी ३ वा. अर्थसंकल्पावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विभागातील डॉ. केदार मारुलकर 'माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला बजेटने काय दिले?' या विषयावर मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सुभाष कोंबडे आहेत. अध्यासनाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये हा कार्यक्रम होईल. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून जिज्ञासूंनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

0 6 FEB 2026

लोकमत

# विद्यापीठात उद्या अर्थसंकल्पावर व्याख्यान

कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये उद्या, शुक्रवार दि. ६ रोजी दुपारी ३ वाजता अर्थसंकल्पावर विशेष व्याख्यान होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विभागातील डॉ. केदार मारुलकर 'माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला बजेटने काय दिले?' या विषयावर मांडणी करणार आहेत. सहभागी होण्याचे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

0 6 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# मार्च, एप्रिलमधील परीक्षांच्या तारखा जाहीर

## शिवाजी विद्यापीठाकडून वेळापत्रक निश्चित : अंतिम तारीख येण्यापूर्वी अर्ज, शुल्क भरण्याचे आवाहन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल २०२६ मध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षांसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घ्यायच्या आणि परीक्षा शुल्कासह महाविद्यालयाने विद्यापीठात परीक्षा अर्ज व शुल्क सादर करावयाच्या अंतिम तारखा जाहीर केल्या आहेत. यात कला, वाणिज्य, शिक्षणाशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्सटाईल, बी. टेक. विधी या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. यामध्ये विद्यापीठाने काही महत्वाच्या सूचनाही केल्या आहेत.

महाविद्यालयांकडे जसजसे परीक्षा अर्ज जमा होतील, तसतसे ज्या, त्या दिवशीच परीक्षा अर्ज ऑनलाईन अप्रूव्ह करण्यात यावेत. अंतिम दिनांकाची प्रतीक्षा करण्यात येऊ नये, असे घडल्यास सर्व्हरवर अतिरिक्त ताण येतो व कामकाज



ठप्प होते, याकडेही लक्ष वेधले.

### अनुत्तीर्ण व एटीकेटी विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क

जे विद्यार्थी पन्नास टक्के किंवा पन्नास टक्के पेक्षा कमी विषय अनुत्तीर्ण असतील अशांकडून एकूण परीक्षा शुल्काच्या ५० टक्के शूल्क आकारण्यात यावे. जे विद्यार्थी हे ५० टक्के पेक्षा जास्त अनुत्तीर्ण असतील अशांकडून संपूर्ण परीक्षा शुल्क आकारण्यात यावे. ज्या अभ्यासक्रमांना प्रात्यक्षिक, प्रकल्प परीक्षा आहे. त्या अभ्यासक्रमांना प्रत्येक सत्रासाठी एकूण परीक्षा शुल्काच्या ५० टक्के शुल्क प्रात्यक्षिक, प्रकल्प परीक्षा शुल्क म्हणून घेण्यात यावे. तथापि दोन्ही प्रात्यक्षिक, प्रकल्प परीक्षा एकाच सत्रात एकाचवेळी घेतल्यास एम. ए. मानसशास्त्र वगळून हे शुल्क एकदाच आकारावे. महाविद्यालयासह अधिविभागाने विद्यापीठाकडे जमा करावयाच्या तारखासंबंधी निर्देश दिले आहेत.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागात परीक्षा अर्ज भरावयाच्या व महाविद्यालय, अधिविभाग यांनी बॅच पाडण्याच्या तारखा. नमुद अंतिम दिवसापूर्वी बॅच न तयार केल्यास पुढील दिवशी संगणक प्रणालीमधून विलंब आकार लागू राहील व तो भरणे कॉलेजला बंधनकारक राहील.

| विना विलंब शुल्क | विलंब शुल्कासह | अतिरिक्त शुल्कासहीत |
|---|---|---|
| | ५० रु. पर्यंत | ५०- ३०० रु. पर्यंत |
| ९ फेब्रु. ते २३ फेबु. | २४ फेब्रु. ते २७ फेब्रु | २८ फेब्रु ते ५ मार्च |

निश्चित मुदतीतच शुल्क जमा करावे,. अन्यथा मुदतीनंतर शुल्क जमा केल्यास नियमानुसार विलंब शुल्क आकारण्यात येईल, असेही या पत्रकात म्हटले आहे.

| विना विलंब शुल्क | विलंब शुल्कासह | अतिरिक्त शुल्कासहीत |
|---|---|---|
| | ५० रु. पर्यंत | ५०- ३०० रु. पर्यंत |
| २४ फेब्रु. २०२६ | २८ फेब्रु. २०२६ | ६ मार्च २०२६ |

### परीक्षा अर्जांच्या याद्या जमा करावयाच्या तारखा

| विना विलंब शुल्क | विलंब शुल्कासह | अतिरिक्त शुल्कासहीत |
|---|---|---|
| | ५० रु. पर्यंत | ५०- ३०० रु. पर्यंत |
| २७ फेब्रु. | | १० मार्च २०२६ |

06 FEB 2026

पुढारी

# परीक्षा अर्ज भरण्यास ९ रोजी पासून सुरुवात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च व एप्रिल २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी अर्ज भरण्यास ९ रोजीपासून सुरुवात होत आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्सटाईल्स, बी. टेक., विधी आदी परीक्षांसाठी २३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे.

परीक्षा अर्ज २३ फेब्रुवारी पर्यंत न भरल्यास २४ ते २७ फेब्रुवारी पर्यंत पन्नास रुपये विलंब शुल्क तर २८ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत ५० ते ३०० रुपयांपर्यंत अति विलंब शुल्क आकारले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा अधिविभागात अर्ज भरायचा आहे.

परीक्षेसंदर्भातील संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. विद्यार्थी, महाविद्यालय अधिविभागांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

0 6 FEB 2026

जनप्रवास


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षण, उद्योगासह विकासमार्ग दाखविणारा अर्थसंकल्प

## शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात डॉ. मारुलकर यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

केंद्र सरकारचा अर्थसंकल्प-२०२६ हा शिक्षण, उद्योग आणि रोजगाराचा विकासमार्ग असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. केदार मारुलकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत "अर्थसंकल्प २०२६: विकसित भारताकडे वाटचाल" या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. उपकुलसचिव विनय शिंदे प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत आयोजित व्याख्यानाप्रसंगी डॉ. केदार मारुलकर . सोबत डॉ. कृष्णा पाटील, विनय शिंदे आदी.**

यावेळी डॉ. मारुलकर म्हणाले, अर्थसंकल्पातील तरतुदींमधून देशाच्या विकासाची दिशा स्पष्ट दिसते. वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी या अर्थसंकल्पाचे सखोल विश्लेषण केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्प वाचनाची नवी दृष्टी प्राप्त केली पाहिजे.

अर्थसंकल्पातील पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, शिक्षण, रोजगारनिर्मिती, एमएसएमई क्षेत्र, कररचना आणि सामाजिक कल्याण या बाबींवरील तरतुदींचे त्यांनी सविस्तर विश्लेषण केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. डॉ. सुशांत माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुमन लोहार यांनी परिचय करून दिला. डॉ.सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले.

### देशाच्या विकासासाठी मार्गदर्शक...

डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षीय भाषणात म्हणाले, अर्थसंकल्प देशाच्या विकासासाठी मार्गदर्शक म्हणून काम करीत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी तो बारकाईने समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

06 FEB 2026
तरुण भारत
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरणाचा शोध

- शिवाजी विद्यापीठाचे संशोधन
- संशोधनास भारतीय पेटंट

प्रतिनिधी
कोल्हापूर

एखाद्या ठिकाणी बसविलेली ध्वनीयंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे सुवाह्य (पोर्टेबल) ध्वनीशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी यश मिळविले आहे. या संशोधनाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर, जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे व डॉ. रोहित दब्बे आणि इचलकरंजी येथील डीकेटीईएस टेक्स्टाईल अँन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ. चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साऊंड अॅबसॉर्शन टेस्टर' हे उपकरण तयार केले आहे.

व्यावसायिक ध्वनीयंत्रणेच्या ध्वनीशोषण क्षमतेच्या चाचणीसाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त सिद्ध झाले आहे. आजपर्यंत एखादा रेकॉर्डिंग स्टुडिओ, रेकॉर्डिंग कक्ष, थिएटर, सभागृह आदी ठिकाणी ध्वनीयंत्रणेसह



ध्वनीशोषक यंत्रणा बसविल्यानंतर तिची क्षमता, ध्वनीशोषणातील अपेक्षित परिणामकारकता यासंदर्भात, अनुभवातूनच चाचपणी केली जात आहे. तथापि, या उपकरणामुळे आता ध्वनीशोषण यंत्रणा बसविल्यावर लगोलग तिच्या क्षमतेची शास्त्रीय चाचणी करता येणे शक्य होणार आहे. अशा प्रकारचे हे उपकरण प्रथमच निर्माण करण्यात संशोधकांना यश मिळाले आहे.

ध्वनीशोषण करणाऱ्या पोर्टेबल शीट्स आणि पॅनल यांचा उपयोग मुख्यत्वे थिएटर, स्टुडिओ आणि व्होकल रेकॉर्डिंग कक्ष यांसारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात केला जातो. ध्वनीशोषक वापरल्यामुळे मायक्रोफोनभोवती येणारा प्रतिध्वनी (एको) शोषून रेकॉर्डिंगसाठी 'शांत' वातावरण तयार केले जाते. यामुळे अधिक स्वच्छ आणि अधिक व्यावसायिक व्होकल किंवा वाद्यांचा आवाज मिळविण्यास मदत होते. सदर पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरणाचा वापर आवाज नियंत्रित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध अॅबसॉर्बर उदा. छिद्र असणारे फोम, फायबर, फॅब्रिक, मेम्ब्रेन, पॅनल, रेझोनंट अॅबसॉर्बर तसेच प्रतिध्वनी कमी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ध्वनीशोषकाची गुणवत्ता सुधारण्यासाठी होतो.

या पेटंटच्या प्राप्तीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.

## ध्वनीशोषक उपकरणाची कार्यप्रणाली


पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरणाच्या कार्यपद्धतीची माहिती देताना डॉ. गरडकर म्हणाले, मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्ट्झ ते २० किलोहर्ट्झ स्पेक्ट्रम इतका आहे. या नव्याने शोधलेल्या ध्वनीशोषक चाचणी उपकरणामध्ये त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनीतरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनीशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून त्यावरून परावर्तित केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनीतरंग मायक्रोफोन (डिटेक्टर) द्वारे करंट / व्होल्ट स्वरुपात उपकरणाच्या स्क्रिनवर प्रदर्शित केली जातात. याद्वारे त्याठिकाणी ध्वनीशोषक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित आहे किंवा कसे, याविषयीचा अंदाज बांधून लगेच त्यावर उपयोजनही करणे शक्य होते. ध्वनीयंत्रणा तपासणीच्या क्षेत्रात अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 FEB 2026

पुण्यनगरी

# पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात संशोधकांना यश





**। कोल्हापूर :** एखाद्या ठिकाणी बसवलेली ध्वनियंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे सुवाह्य (पोर्टेबल) ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी यश मिळवले आहे. या संशोधनाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर, जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे व डॉ. रोहंत ढब्बे आणि इचलकरंजी येथील डीकेटीईएस टेक्स्टाईल अँड इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ.चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साऊंड अॅबसॉर्प्शन टेस्टर' हे उपकरण तयार केले आहे. व्यावसायिक ध्वनियंत्रणेच्या ध्वनिशोषण क्षमतेच्या चाचणीसाठी सदर उपकरण अत्यंत उपयुक्त सिद्ध झाले आहे. आजपर्यंत एखादा रेकॉर्डिंग स्टुडिओ, रेकॉर्डिंग कक्ष, थिएटर, सभागृह इत्यादी ठिकाणी ध्वनियंत्रणेसह ध्वनिशोषक यंत्रणा बसवल्यानंतर तिची क्षमता, ध्वनिशोषणातील अपेक्षित परिणामकारकता यासंदर्भात अनुभवातूनच चाचणी केली जात आहे. तथापि, सदर उपकरणामुळे आता ध्वनिशोषण यंत्रणा बसवल्यावर लगोलग तिच्या क्षमतेची शास्त्रीय चाचणी करता येणे शक्य होणार आहे. अशा प्रकारचे हे उपकरण प्रथमच निर्माण करण्यात संशोधकांना यश आले आहे.

ध्वनिशोषण करणाऱ्या पोर्टेबल शीटस् आणि पॅनल यांचा उपयोग मुख्यत्वे थिएटर, स्टुडिओ आणि व्होकल रेकॉर्डिंग कक्ष यासारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात केला जातो. ध्वनिशोषक वापरल्यामुळे मायक्रोफोनभोवती येणारा प्रतिध्वनी (एको) शोषून रेकॉर्डिंगसाठी शांत वातावरण तयार केले जाते. यामुळे अधिक स्वच्छ आणि अधिक व्यावसायिक व्होकल किंवा वाद्यांचा आवाज मिळवण्यास मदत होते. हे पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरणाचा वापर आवाज नियंत्रित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध अॅबसॉर्बर उदा. छिद्र असणारे फोम, फायबर, फॅब्रिक, मेम्ब्रेन, पॅनल, रेझोनंट अॅबसॉर्बर, तसेच प्रतिध्वनी कमी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ध्वनिशोषकाची गुणवत्ता सुधारण्यासाठी होतो.

## ध्वनिशोषक उपकरणाची कार्यप्रणाली

मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्ट्झ ते २० किलो हर्ट्झ स्पेक्ट्रम इतका आहे. या नव्याने शोधलेल्या ध्वनिशोषक चाचणी उपकरणामध्ये त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनितरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनिशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून त्यावरून परावर्तित केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनितरंग मायक्रोफोन (डिटेक्टर) द्वारे करंट-व्होल्ट स्वरूपात उपकरणाच्या स्क्रीनवर प्रदर्शित केली जातात. याद्वारे त्याठिकाणी ध्वनिशोषक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित आहे किंवा कसे, याविषयीचा अंदाज बांधून लगेच त्यावर उपयोजनही करणे शक्य होते. ध्वनिशोषण फॅब्रिकेशन क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठीही हे उपकरण उपयुक्त आहे. हे उपकरण वाहतूक सुलभ व कमी खर्चिक आहे. ध्वनियंत्रणा तपासणीच्या क्षेत्रात ते अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास डॉ. गरडकर त्यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे पेटंटप्राप्त पोर्टेबल साऊंड अॅबसॉर्प्शन टेस्टर उपकरण, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. संदीप साबळे, डॉ. रोहंत ढब्बे, डॉ. चंद्रला जतकर.

06 FEB 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरणास पेटंट

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनास यश

लोकमत न्यूज नेटवर्क





कल्याणराव गरडकर



संदीप साबळे



रोहंत ढब्बे



चंद्रला जतकर

**कोल्हापूर :** एखाद्या ठिकाणी बसविलेली ध्वनियंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश मिळाले आहे. या संशोधनाला भारतीय पेटंट मिळाले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. संदीप साबळे, डॉ. रोहंत ढब्बे आणि इचलकरंजी येथील डी. के. टी. ई. एस. टेक्स्टाइल अँण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ. चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साउंड अँबसॉर्प्शन टेस्टर' हे उपकरण तयार केले आहे. व्यावसायिक ध्वनीयंत्रणेच्या ध्वनीशोषण क्षमतेच्या चाचणीसाठी हे उपकरण उपयुक्त सिद्ध झाले आहे.

एखादा रेकॉर्डिंग स्टुडिओ, रेकॉर्डिंग कक्ष, थिएटर, सभागृहाच्या ठिकाणी ध्वनीयंत्रणेसह ध्वनीशोषक यंत्रणा बसविल्यानंतर तिची क्षमता, ध्वनीशोषणातील अपेक्षित परिणामकारकता यासंदर्भात अनुभवातूनच चाचपणी केली जात आहे. मात्र, या उपकरणामुळे आता ध्वनीशोषण यंत्रणा बसविल्यावर तत्काळ तिच्या क्षमतेची शास्त्रीय चाचणी करता येणे शक्य होणार आहे. अशा प्रकारचे हे पहिलेच उपकरण आहे. या पेटंटबद्दल शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

कमी खर्चिक आणि पोर्टेबल

मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्ट्झ ते २० किलोहर्ट्झ स्पेक्ट्रम इतका आहे. हे नवे उपकरण पोर्टेबल आणि कमी खर्चिक आहे. या नव्या उपकरणात त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनितरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनिशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून तेथून परावर्तीत केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनितरंग माइक्रोफोनद्वारे करंट किंवा व्होल्ट स्वरुपात उपकरणाच्या स्क्रीनवर प्रदर्शित होतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 FEB 2026 पुढारी

# ध्वनियंत्रणा तपासणीसाठी ध्वनिशोषक उपकरण उपयुक्त

## पोर्टेबल ध्वनिशोषक बनविण्यात संशोधकांना यश; शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनास भारतीय पेटंट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एखाद्या ठिकाणी बसविलेली ध्वनियंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी यश मिळविले आहे. या संशोधनाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठाचे ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर, जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे, डॉ. रोहंत ढब्बे आणि इचलकरंजी येथील डी.के.टी.ई.एस. टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ. चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साऊंड अॅबसॉर्प्शन टेस्टर' हे उपकरण तयार केले. व्यावसायिक ध्वनियंत्रणेच्या ध्वनिशोषण क्षमतेच्या चाचणीसाठी हे उपकरण उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे.



डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. रोहंत ढब्बे, डॉ. संदीप साबळे, डॉ. चंद्रला जतकर


पोर्टेबल ध्वनिशोषक उपकरणाच्या कार्यपद्धतीची माहिती देताना डॉ. गरडकर म्हणाले, मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्टझ् ते २० किलोहर्टझ् स्पेक्ट्रम इतका आहे. या नव्याने शोधलेल्या ध्वनिशोषक चाचणी उपकरणामध्ये त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनितरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनिशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून त्यावरुन परावर्तीत केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनितरंग मायक्रोफोन (डिटेक्टर) द्वारे करंट, व्होल्ट स्वरूपात उपकरणाच्या स्क्रीनवर प्रदर्शित केली जातात. याद्वारे त्याठिकाणी ध्वनिशोषक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित आहे का, याबाबतचा अंदाज बांधून लगेच त्यावर उपयोजनही करणे शक्य होते. ध्वनिशोषण फॅब्रिकेशन क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठीही हे उपकरण उपयुक्त आहे. हे उपकरण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज नेता येतेच, त्याशिवाय ते कमी खर्चिकही आहे. ध्वनियंत्रणा तपासणी क्षेत्रात ते अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास डॉ. गडकर यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी संशोधकांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
06 FEB 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांनी बनविले 'पोर्टेबल ध्वनिशोषक' चाचणी उपकरण

## शिवाजी विद्यापीठातील संशोधनास भारतीय पेटंट

**सकाळ वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाचे पेटंटप्राप्त पोर्टेबल साऊंड ॲबसॉर्प्शन टेस्टर उपकरण

कोल्हापूर, ता. ५ : एखाद्या ठिकाणी बसविलेली ध्वनियंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे सुवाह्य (पोर्टेबल) ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी यश मिळविले आहे. या संशोधनाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

विद्यापीठाचे ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर, जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे आणि डॉ. रोहंत ढब्बे, इचलकरंजी येथील डी.के.टी.ई.एस. टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ. चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साऊंड ॲबसॉर्प्शन टेस्टर' हे उपकरण तयार केले आहे. व्यावसायिक ध्वनियंत्रणेच्या ध्वनिशोषण क्षमतेच्या चाचणीसाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त सिद्ध झाले आहे. आजपर्यंत एखादा रेकॉर्डिंग स्टुडिओ, रेकॉर्डिंग कक्ष, थिएटर, सभागृह इत्यादी ठिकाणी ध्वनियंत्रणेसह ध्वनिशोषक यंत्रणा बसविल्यानंतर तिची क्षमता, ध्वनिशोषणातील अपेक्षित परिणामकारकता यासंदर्भात अनुभवातूनच चाचपणी केली जात आहे. या उपकरणामुळे आता ध्वनिशोषण यंत्रणा बसविल्यावर लगोलग तिच्या क्षमतेची शास्त्रीय चाचणी करता येणे शक्य होणार आहे. अशा प्रकारचे हे उपकरण प्रथमच निर्माण करण्यात संशोधकांना यश मिळाले आहे.

ध्वनिशोषक वापरल्यामुळे मायक्रोफोनभोवती येणारा प्रतिध्वनी (एको) शोषून रेकॉर्डिंगसाठी 'शांत' वातावरण तयार केले जाते. यामुळे अधिक स्वच्छ आणि अधिक व्यावसायिक व्होकल किंवा वाद्यांचा आवाज मिळविण्यास मदत होते. या पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरणाचा वापर आवाज नियंत्रित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध ॲबसॉर्बर तसेच प्रतिध्वनी कमी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ध्वनिशोषकाची गुणवत्ता सुधारण्यासाठी होतो. या संशोधकांचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी अभिनंदन केले.

### ध्वनिशोषक उपकरणाची कार्यप्रणाली

मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्ट्झ ते २० किलोहर्ट्झ स्पेक्ट्रम इतका आहे. या नव्याने शोधलेल्या ध्वनिशोषक चाचणी उपकरणामध्ये त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनितरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनिशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून त्यावरून परावर्तित केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनितरंग माइक्रोफोन (डिटेक्टर) द्वारे करंट अथवा व्होल्ट स्वरूपात उपकरणाच्या स्क्रीनवर प्रदर्शित केली जातात. याद्वारे त्याठिकाणी ध्वनिशोषक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित आहे किंवा कसे, याविषयीचा अंदाज बांधून लगेच त्यावर उपयोजनही करणे शक्य होते.

ध्वनिशोषण फॅब्रिकेशन क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठीही हे उपकरण उपयुक्त आहे. हे उपकरण सुवाह्य म्हणजेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज नेता येतेच, त्याशिवाय ते कमी खर्चिकही असल्याचे डॉ. गरडकर यांनी सांगितले.

0 6 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्टेबल ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात यश

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना भारतीय पेटंट : ध्वनिशोषण यंत्रणा बसविल्यावर लगेचच क्षमतेची शास्त्रीय चाचणी करणे शक्य

**जनप्रवास : कोल्हापूर**

एखाद्या ठिकाणी बसविलेली ध्वनियंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे सुवाह्य (पोर्टेबल) ध्वनिशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी यश मिळविले. या संशोधनाला भारतीय पेटंट प्राप्त झाले.

शिवाजी विद्यापीठाचे ज्येष्ठ. रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर,जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे व डॉ. रोहंत ढब्बे आणि इचलकरंजी येथील डी. के. टी.ई. एस. टेक्स्टाईल अँन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ. चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साऊंड ॲबसॉर्प्शन टेस्टर'हे उपकरण तयार केले आहे. व्यावसायिक ध्वनीयंत्रणेच्या ध्वनीशोषण क्षमतेच्या चाचणीसाठी सदर उपकरण अत्यंत उपयुक्त सिद्ध झाले आहे. आजपर्यंत एखादा रेकॉर्डिंग स्टुडिओ, रेकॉर्डिंग कक्ष, थिएटर, सभागृह इत्यादी ठिकाणी ध्वनीयंत्रणेसह ध्वनीशोषक यंत्रणा बसविल्यानंतर तिची क्षमता, ध्वनीशोषणातील अपेक्षित परिणामकारकता यासंदर्भात अनुभवातूनच चाचपणी केली जात आहे. तथापि, सदर उपकरणामुळे आता ध्वनीशोषण यंत्रणा बसविल्यावर लगोलग तिच्या क्षमतेची शास्त्रीय चाचणी करता येणे शक्य होणार आहे. अशा प्रकारचे हे उपकरण प्रथमच निर्माण करण्यात संशोधकांना यश आले.


डॉ. गरुडकर


डॉ. साबळे


डॉ. ढब्बे


डॉ. जतकर

**रेकॉर्डिंगसाठी 'शांत' वातावरण होते**

ध्वनीशोषण करणाऱ्या पोर्टेबल शीट्स आणि पॅनल यांचा उपयोग मुख्यत्वे थिएटर, स्टुडिओ आणि व्होकल रेकॉर्डिंग कक्ष यांसारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात केला जातो. ध्वनीशोषक वापरल्यामुळे मायक्रोफोन भोवती येणारा प्रतिध्वनी (एको) शोषून रेकॉर्डिंगसाठी 'शांत' वातावरण तयार केले जाते. यामुळे अधिक स्वच्छ आणिअधिक व्यावसायिक व्होकल किंवा वाद्यांचा आवाज मिळविण्यास मदत होते.

ध्वनी शोषकाची गुणवत्ता सुधारण्यासाठी हे पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरणाचा वापर आवाज नियंत्रित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध ॲबसॉर्बर उदा. छिद्र असणारे फोम, फायबर, फॅब्रिक, मेंम्ब्रेन, पॅनल, रेझोनंट ॲबसॉर्बर तसेच प्रतिध्वनी कमी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ध्वनी शोषकाची गुणवत्ता सुधारण्यासाठी होतो.

**उपकरणाची कार्यप्रणाली**

या पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरणाच्या कार्यपद्धतीची माहिती देताना डॉ. गरडकर म्हणाले, मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्ट्झ ते २० किलोहर्ट्झ स्पेक्ट्रम इतका आहे. या नव्याने शोधलेल्या ध्वनीशोषक चाचणी उपकरणामध्ये त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनीतरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनीशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून त्यावरुन परावर्तित केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनीतरंग माइक्रोफोन(डिटेक्टर) द्वारे करंट/व्होल्टस्वरुपात उपकरणाच्या स्क्रीनवर प्रदर्शित केली जातात. याद्वारे त्याठिकाणी ध्वनीशोषक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित आहे किंवा कसे, याविषयीचा अंदाज बांधून लगेच त्यावर उपायोजनही करणे शक्य होते. ध्वनीशोषण फॅब्रिकेशन क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठीही हे उपकरण उपयुक्त आहे. हे उपकरण कमी खर्चिकही आहे. ध्वनीयंत्रणा तपासणीच्या क्षेत्रात ते अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पेटंट प्राप्तीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे प्रभारीकुलगुरू डॉ.सुरेश गोसावी आणि प्रभारी प्र-कुलगुरूडॉ.ज्योती जाधव यांनीसर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

> बऱ्याच स्टुडिओमध्ये बसवलेले इको सिस्टिम या सदोष असू शकतात. एखादे इको सिस्टिम बसवल्यावर ते सदोष आहे की परफेक्ट आहे, हे यापूर्वी समजत नव्हते किंवा त्याची पडताळणी किंवा तपासणी करण्याची व्यवस्था कुठेही उपलब्ध नव्हती. आता मात्र, हे टेस्टर उपकरण तयार केल्याने या माध्यमातून अचूक व सुस्पष्ट आवाज प्रेक्षकांपर्यंत कसा पोहोचेल, हे पाहता येऊ शकते. हे उपकरण विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रयोगशाळेसह जयसिंगपूर कॉलेजमध्ये तयार केले असून यासाठी दीड वर्षाचा काळ लागला.
>
> **- डॉ. कल्याणराव गरडकर, ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ, शिवाजी विद्यापीठ**